# प्रेसनोट

दि. १३/०७/२०२३

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे येथील तत्कालीन उपायुक्त तथा सदस्य व त्यांची पत्नी यांचेवर ज्ञात उत्पनापेक्षा जास्त मालमत्ता बाळगले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३४०/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३ (१)(ब), १३(२), भा.दं.वि. क. १०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्रीमती. माधुरी भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. नितिन चंद्रकांत ढगे, वय - ४१ वर्षे, तत्कालीन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे.<br>२) सौ. प्रतिभा नितीन ढगे, वय ३५ वर्ष, रा. स.नं.७१, सीएसटी नं.१४३६, रहेजा गार्डन्स, लव्हेड ए फ्लॅट नं.५०२, वानवडी, पुणे. (आरोपी लोकसेवक क्र. १ यांची पत्नी) |
| परिक्षण कालावधी | दि. १३/०९/२००६ ते दि. १५/१०/२०२१ पर्यंत. |
| अपसंपदा निष्पन्न रक्कम | १,२८,९५,१५०/- रुपये (ज्ञात उत्पन्नापेक्षा ४७ % जास्त) |

गुन्हा दाखल दिनांक :- १३/०७/२०२३ रोजी सकाळी ०९.४२ वाजता.

थोडक्यात माहिती :- यातील आरोपी लोकसेवक श्री. नितीन ढगे यांचेविरुध्द ला.प्र.वि. पुणे यांचेकडून सन २०२१ मध्ये सापळा कारवाई करण्यात आली होती. त्यावरुन वानवडी पो. स्टे. गु.र.नं ३६६/२०२१, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये दिनांक १६/१०/२०२१ रोजी गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर त्यांचे रहाते घराचे घरझडतीमध्ये रक्कम रु १,२८,४९,०००/- रुपये रोख मिळुन आल्याने त्यांच्या मालमत्तेची उघड चौकशी सन २०२१ मध्ये चालु करण्यात आली होती. उघड चौकशीअंती लोकसेवक श्री. नितीन ढगे यांनी रक्कम १,२८,९५,१५०/- (ज्ञात उत्पन्नापेक्षा ४७ % जास्त) इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक श्री. नितीन ढगे यांना त्यांची पत्नी सौ. प्रतिभा नितीन ढगे यांनी अपप्रेरणा दिल्याने तसेच खोटी माहिती कागदपत्रामध्ये भरुन वापरुन शासनाची फसवणुक केली म्हणुन लोकसेवक श्री. नितीन ढगे व त्यांची पत्नी सौ. प्रतिभा ढगे यांचेविरुध्द वरीलप्रमाणे उघड चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. सुदाम पाचोरकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

N/k00
Acp
13/07/2023

(नितीन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.